**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक १७/२०२०** | **दिनांक २८/०२/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,** विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,** नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,** तांत्रिक अधिकारी कृषिविदया विभाग ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २२/०२/२०२० ते २८/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २९/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून ०४/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/०२ | २३/०२ | २४/०२ | २५/०२ | २६/०२ | २७/०२ | २८/०२ | | २९/०२ | ०१/०३ | ०२/०३ | ०३/०३ | ०४/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३७.० | ३७.४ | ३८.० | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३१ | ३० | ३० | ३० |
| १६.८ | १७.५ | १६.२ | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | १८ | १८ | १८ | १९ | १९ |
| ० | ० | ० | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | २ | १ | १ | ० |
| ६४ | ८० | ७४ | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ४१ | ५५ | ५३ | ५७ | ६३ |
| २३ | २१ | १६ | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २२ | २३ | २७ | २८ | ३१ |
| ३.१ | ३.२ | २.९ | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ३ | ४ | ४ | ५ | ४ |
| नै. | शांत | शांत | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | पू. | पू. | आ. | नै.द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ५१९७.२ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २९ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२० दरम्यान कमाल तापमान ३० ते ३१ अं.सें. व किमान तापमान १८ ते १९ अं.सें. दरम्यान राहून आकाश मुख्यत: निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **फुटवे अवस्था** | • उन्हाळी भात पिक फुटवे अवस्थेत असताना भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. पर्यंत नियंत्रित करावी. |
| **आंबा** | **फळधारणा** | • फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा आकाराच्या अवस्थेत तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **नारळ** | **-** | • नारळावर रुगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीची पिल्ले आणि प्रौढ पानाच्या खालील बाजूस रस शोषतात. माशीच्या शरीरातून स्त्रवणाऱ्या गोड चिकट स्त्रावाकडे मुंग्या आकर्षित होतात. त्यांच्यामुळे स्त्राव सर्वत्र पानांवर पसरतो. पानांवरील स्त्रावावर कालांतराने काळ्या बुरशीची वाढ होते. परिणामी, प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होतो. चक्राकार पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी झाडावर नियमित पाण्याची फवारणी करावी. तसेच पानावरील काळी बुरशीच्या व्यवस्थापनासाठी पानांवर पाण्याचा १ टक्के स्टार्च सोल्युशन फवारावे.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **सुपारी** | **-** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कलिंगड** | **फळधारणा** | • कलिंगड पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यावर फळमाशीच्या नियंत्रणासाठी क्यु ल्युर 'रक्षक' सापळे प्रती हेक्टरी ४ वापरावे. वेळोवेळी कीडग्रस्त फळे जाळून नष्ट करावीत.<br>• कलिंगडाची फळे सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी फळे भाताच्या पेंढ्याने किंवा गवताने झाकून घ्यावीत. |
| **भेंडी** | **फळधारणा** | • भेंडी पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किड पिकातील अन्नरस शोषून पिकाच्या विविध भागावर मधासारखा चिकट स्त्राव टाकत असल्याने पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त पाने/ शेंडे नष्ट करावेत तसेच प्रवाही डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकामध्ये पिवळे चिकट कागद सापळे लावावेत. |

| | | |
|---|---|---|
| **कुकुटपालन** | - | • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे.<br>• रानीखेत (मानमोडी) आजारापासून पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी उन्हाळाच्या सुरुवातीलाच पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत (मानमोडी) प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**